# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः17.01.2026** **वारःशनिवार**

---

1. महाराष्ट्रातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीत 21 पेक्षा जास्त महापालिकांवर भारतीय जनता पार्टी आणि महायुतीला घवघवीत यश
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून पश्चिम बंगाल आणि आसामच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर
3. भारताची डीप-टेक क्षेत्रातील स्टार्टअप परिसंस्था भविष्यात महत्त्वाची भूमिका बजावणार-अश्विनी वैष्णव यांचं प्रतिपादन आणि
4. रशिया-युक्रेन युध्दाच्या पार्श्वभूमीवर युक्रनमध्ये उणे 19 अंश सेल्सिअस तापमानात सामान्य जनजीवन विस्कळीत

**निकाल**

महाराष्ट्रातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीत 21 पेक्षा जास्त महापालिकांवर भारतीय जनता पार्टी आणि महायुतीला घवघवीत यश मिळालं आहे. मुंबई ही आपल्या राष्ट्राचा अभिमान आहे. ती आकांक्षांचे शहर आहे. देशाच्या विकासाला गती देणारे हे शहर आहे. एनडीएला आशीर्वाद दिल्याबद्दल मुंबईतील माझ्या बंधू-भगिनींप्रती मी मनापासून कृतज्ञता व्यक्त करतो. मुंबईत महाराष्ट्राच्या चैतन्यशील संस्कृतीचे सर्वोत्तम दर्शन घडते. या महान मूल्यांनी प्रेरित होऊन, आम्ही शहरातील नागरिकांना सुशासन आणि 'सुलभ जीवनमान' प्रदान करू. असा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर महायुतीचं अभिनंदन करताना दिला आहे.

**प्रतिक्रिया**

राज्यातल्या इतर महानगरपालिकांच्या निवडणुकीत भाजपाला मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल पंतप्रधानांनी राज्यातल्या जनतेप्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे. महायुती सरकारच्या लोकाभिमुख विकासावरच लोकांचा विश्वास आहे, हे यातून सिद्ध झाल्याचं मोदी यांनी समाजमध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. केंद्रीय मंत्री अमित शहा आणि नितीन गडकरी यांनी यांनीही समाजमाध्यमावरून पक्षनेतृत्व आणि कार्यकर्त्यांचं अभिनंदन केलं आहे.

भाजपाच्या या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेचे आभार मानले आहेत, याबाबत काल माध्यमांशी बोलताना फडणवीस म्हणाले...

**आणि ज्याप्रकारे वेगवेगळ्या महानगरपालिकांमध्ये रेकॉर्ड ब्रेक अशा पद्धतीचं मँडेट आहे. या मँडेट ने एक गोष्ट स्पष्ट केली आहे की लोकांना विकास हवा आहे. लोकांना प्रामाणिकता हवी आहे आणि म्हणून लोकांनी आपल्याला या ठिकाणी निवडून दिलेलं आहे. आणि आज एक गोष्ट अजून या निकालाने स्पष्ट केलेली आहे. महाराष्ट्राचा विश्वास हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींवरच आहे हे देखील या निकालाने स्पष्ट केलेलं आहे. आणि म्हणून आज खऱ्या अर्थानं या निकालाच्या निमित्ताने हिंदूहृदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचंही मी स्मरण करतो कारण त्यांचाही आशीर्वाद हा आपल्या महायुतीच्याच पाठीशी होता आणि म्हणून हा विजय आपल्याला या ठिकाणी मिळालेला आहे. आणि पुढेही आमचा एजेंडा हा विकासच असणार आहे.**

भारतीय जनता पक्ष आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या युतीने 227 पैकी 118 जागा जिंकून बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळवले आहे. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने काल मध्यरात्रीपर्यंत 29 महानगरपालिकांमधील 2 हजार 869 पैकी 2 हजार 784 जागांचे निकाल जाहीर केले. भारतीय जनता पक्ष 1 हजार 372 जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला आहे.

ठाण्याचा गड राखण्यात एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला यश आलं आहे, तर भिवंडी निजामपूर, लातूर आणि चंद्रपूरमध्ये कॉंग्रेसला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत. परभणीमध्ये उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाला यश मिळालं आहे. कोल्हापूरमध्ये महायुतीचा विजय झाला असला तरी तिथे कॉंग्रेसनं युतीला जोरदार टक्कर दिली.

**<u>मुंबई-ठाणे परिसर</u>**

बृहन्मुंबई महानगरपालिकेत कॉंग्रेस पक्षाला मिळालेलं यश समाधानकारक नसलं तरी यश अपयशाची पर्वा न करता, आम्ही वैचारिक लढाई लढलो, असं कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. जनतेचा कौल हा सर्वोच्च आहे आणि तो आम्ही पूर्ण आदरानं स्वीकारतो, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून पश्चिम बंगाल आणि आसामच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. पश्चिम बंगालमध्ये आज दुपारी मालदा जिल्ह्यातील मालदा टाउन रेल्वे स्थानकावर हावडा आणि गुवाहाटी दरम्यानच्या भारताच्या पहिल्या वंदे भारत स्लीपर ट्रेनला हिरवा झेंडा दाखवतील. मालदा जिल्ह्यात 3 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अनेक रेल्वे आणि रस्ते पायाभूत सुविधा प्रकल्प राष्ट्राला समर्पण आणि पायाभरणी करतील. तसंच गुवाहाटीमध्ये बोडो समुदायाच्या समृद्ध वारशाचा उत्सवात सहभागी होतील.

**<u>वंदे-मातरम</u>**

या वर्षी कर्तव्य पथावर होणारा प्रजासत्ताक दिन सोहळा, 'वंदे मातरम्' या गीताच्या निर्मितीचा 150 वर्षांचा इतिहासाला वेगळी आदरांजली ठरेल तसंच भारताची लष्करी शक्ती आणि सांस्कृतिक विविधतेचा एक अनोखा संगम असेल. अशी माहिती  संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी काल नवी दिल्लीत आयोजित पत्रकार परिषदेत दिली, हा सोहळा 'आत्मनिर्भर भारत'च्या संकल्पनेला वेगळी ओळख देईल असंही ते म्हणाले.

**<u>अश्विनी वैष्णव</u>**

केंद्र सरकारने भविष्याचा वेध घेऊन राबविलेले धोरण आणि या क्षेत्रासाठी केलेली निधीची भरीव तरतूद यामुळे भारताची डीप-टेक क्षेत्रातील स्टार्टअप परिसंस्था विस्तारत आहे. ही परिसंस्था तंत्रज्ञान क्षेत्रासाठी भविष्यात महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचं केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत म्हटलं आहे. आज भारतातील 80 टक्के स्टार्टअप्स कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आहेत. इंडिया सेमीकंडक्टर मिशन अंतर्गत डिझाइन लिंक्ड इन्सेंटिव्ह योजनेने आतापर्यंत 23 स्टार्टअप्सना पाठिंबा दिला आहे. गेल्यावर्षी संस्थात्मक निधीसाठी, सेमीकॉन इंडिया परिषदेत एक अब्ज डॉलर्सच्या इंडिया डीप टेक अलायन्सची घोषणा करण्यात आली होती. असंही वैष्णव यांनी सांगितलं.

**<u>स्टार्टअप</u>**

भारत स्टार्टअप अभियान ही केवळ अभियान नसून विविध क्षेत्रातल्या नवनव्या संधींचं ते एक इंद्रधनुष्य आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत भारत मंडपम इथं केलं. राष्ट्रीय स्टार्टअप दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. युवकांच्या स्वप्नांचा प्रवास या स्टार्ट अप्समधून दिसून येत असून त्यांनी 10 वर्षांमधे देशात क्रांती घडवून आणली असल्याचं मोदी म्हणाले. हे अभियान सुरू झालं तेव्हा केवळ 500 स्टार्टअप्स होते, ती संख्या 2 लाखांवर गेली आहे आणि त्यामध्ये एकंदर 45 टक्के स्टार्टअप्स ही महिलांनी सुरू केली आहेत, हे अतिशय उल्लेखनीय आहे. राष्ट्रीय स्टार्टअप दिनाचं औचित्य साधून उत्कृष्ट राज्य स्टार्टअप परिसंस्था म्हणून महाराष्ट्राला नेतृत्व श्रेणीतील पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्टार्टअप धोरणाची प्रभावी अंमलबजावणी आणि सर्वसमावेशक सहभाग यासाठी देशातील स्टार्टअप परिसंस्थेतील सर्वोत्तम कामगिरी करणारे राज्य म्हणून महाराष्ट्राला गौरवण्यात आले.

**<u>युक्रेन</u>**

युक्रेनमधील हवाई संरक्षण पुरवठा अपुरा आहे, अनेक प्रणालींमध्ये क्षेपणास्त्रांचा अभाव आहे. युक्रेनच्या ऊर्जा पायाभूत सुविधांवर रशियाने केलेल्या जोरदार हल्ल्यानंतर विजपुरवठा खंडीत झाल्याने थंडीपासून वाचण्यासाठीच्या यंत्रणा बंद आहेत. अशी माहिती युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी दिली. ऊर्जेची कमतरता आणि तापमानाचा पारा उणे-19 अशं सेल्सिअसपर्यंत खाली गेल्यामुळे कीवमधील शाळा फेब्रुवारीपर्यंत बंद राहतील. असं माजमाध्यमावरील संदेशात झलेन्स्की यांनी म्हटलं आहे.

**भारत-जर्मनी**

भारत आणि जर्मनीदरम्यान दूरसंचार सहकार्याबाबत संयुक्त घोषणापत्रावर स्वाक्षरी करण्यात आली. अशी माहिती दळणवळण मंत्रालयानं काल दिली. या क्षेत्रातील अद्ययावत माहिती तसंच उदयोन्मुख आणि भविष्यकालीन तंत्रज्ञानामध्ये सहकार्याला चालना देण्यासंदर्भात सहमती दर्शवली आहे. या महिन्याच्या 12 ते 13 तारखेदरम्यान जर्मनीचे फेडरल चान्सलर फ्रेडरिक मेर्झ यांच्या भारत भेटीदरम्यान या घोषणापत्रावर स्वाक्षरी करण्यात आली. हा करार सर्वसमावेशक आणि शाश्वत डिजिटल परिवर्तनाच्या एकत्रित वाटचालीला वचनबद्धतेचं प्रतिबिंब असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**इराण**

भारत इराणमधील सध्याच्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. तसंच इराणमधील भारतीयांसाठी मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली. अलिकडच्या काळात इराणमधील परिस्थिती लक्षात घेता इराणला भेट देणे टाळण्याचा आणि इराणमधील भारतीयांना परतण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

दरम्यान इराणच्या विविध भागातून भारतीय मायदेशी परतत आहेत. काल रात्री नवी दिल्लीत दाखल झालेल्या भारतीय नागरिकांनी सरकारच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. भारत-जपान संरक्षण सहकार्याबाबत काल नवी दिल्लीत परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि जपानचे परराष्ट्रमंत्री तोशिमित्सू मोतेगी यांच्यात चर्चा झाली. मोतेगी यांनी पंतप्रधानांची सदिच्छा भेट घेतली. भारत-जपान हकार्यासंदर्भातील ही 18 वी बैठक होती.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने आज उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, बिहार, पश्चिम बंगाल, आसाम, सिक्कीम आणि मेघालय या राज्यांमध्ये दाट धुक्याची शक्यता वर्तवली आहे. तर छत्तीसगड आणि पूर्व मध्य प्रदेशात थंडीची लाट येण्याची शक्यता आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार